| MHJN040002902025 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | : | ०५ | ०२ | २०२५ |
| | नोंदणी दिनांक | : | ०५ | ०२ | २०२५ |
| | निकाल दिनांक | : | २३ | ०६ | २०२५ |
| | कालावधी | : | ० व. | ४ म. | १८ दि. |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय क्र.१, अंबड यांचे न्यायालयात**
(पिठासीन न्यायाधीश – एस.एस. जैन )

**कौ.हिं.प्र.का. अर्ज क्र.४/२०२५** **निशाणी क्र.९**

श्रीमती काजल भास्कर जाधव,
वय– २० वर्ष, व्यवसाय–घरकाम
रा. वंजारवाडी, ता. बदनापूर, जि. जालना
ह.मु. बोरी तांडा, ता. अंबड, जि. जालना ... **अर्जदार**

**– विरुध्द –**

१. भास्कर ताराचंद जाधव,
वय–२३ वर्षे, व्यवसाय– शेती,

२. अनुसयाबाई ताराचंद जाधव,
वय–४५ वर्षे, व्यवसाय– शेती व घरकाम,

३. ताराचंद परसराम जाधव,
वय–५० वर्षे, व्यवसाय– शेती,

४. सुमित ताराचंद जाधव,
वय–२९ वर्षे, व्यवसाय–शेती,
गैरअर्जदार क्र.१ ते ४ सर्व
रा. वंजारवाडी, ता. बदनापूर, जि. जालना

५. सवडी संदीप राठोड,
वय– ३२ वर्षे, व्यवसाय– घरकाम,

६. संदीप लोभा राठोड,
वय–४० वर्षे, व्यवसाय– शिक्षण संस्था चालक,
गैरअर्जदार क्र.५ व ६ दोघे
रा. कंडारी, ता. बदनापूर जि. जालना ... **गैरअर्जदार**

---

अर्जदारातर्फे विधीज्ञ - श्री. एस. एम. जाधव

गैरअर्जदारांतर्फे विधीज्ञ - एकतर्फा आदेश पारीत

---

**न्यायनिर्णय**
(दिनांक २३/०६/२०२५)

१. अर्जदाराने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२, १८, १९, २०, २१, २२, २३ प्रमाणे मागण्यांसाठी सदर अर्ज दाखल केलेला आहे.

**अर्जदाराचे कथन संक्षिप्तपणे खालीलप्रमाणे :–**

२. अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ यांची पत्नी असून त्यांचा विवाह दि.१६/०५/२०२४ रोजी मौजे बोरी तांडा, ता. अंबड, जि. जालना येथे हिंदु धर्मशास्त्र जातीरितीरिवाजाप्रमाणे झाला आहे. अर्जदाराच्या आईवडीलांनी लग्नामध्ये ७,००,०००/– रूपये हूंडा, भांडे व अन्य संसार उपयोगी साहित्य देवून थाटामाटात करून दिले. सदरील लग्नसंबंधातून त्यांना कोणतेही अपत्य नाही व आजही त्यांचे पती पत्नीचे नाते अस्तित्वात आहे. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदारांकडे नांदावयास गेली असता गैरअर्जदारांनी तिला एक महिना चांगले नांदविले. त्यानंतर अर्जदाराला मारहाण करणे, चारित्र्यावर संशय घेणे, उपाशी ठेवणे, रात्री बेरात्री घरातून हाकलून देणे, तुला घरातील काही कामधंदा करता येत नाही असे टोमणे मारणे, अर्वाच्य भाषेत सतत शिवीगाळ करणे, तु या घरातून निघून जा, आम्ही गैरअर्जदार क्र.१ याचे लग्न करून घेवू असे म्हणून घर बांधण्यासाठी ८,००,०००/– रूपयाची मागणी करून मारहान करणे, अशाप्रकारे गैरअर्जदार अर्जदारास शारिरीक मानसिक त्रास देत आलेले आहेत. अर्जदाराचे लग्न थाटामाटात करून दिल्यामुळे अर्जदाराच्या आईवडीलांची आर्थिक परिस्थिती अडचणीत आल्यामुळे गैरअर्जदार यांची पैशाची मागणी अर्जदाराचे आईवडील पूर्ण करू शकत नव्हते. त्यामुळे अर्जदारास गैरअर्जदार सतत शारिरीक

व मानसिक त्रास देत असे. गैरअर्जदार क्र.१ हा रात्ररात्र सतत बाहेर राहतो. अर्जदार आजारी असल्यास अर्जदारावर कोणत्याही प्रकारचे उपचार करीत नाही, तसेच संसाराकडे दूर्लक्ष असते.

३. अर्जदार पूढे असे कथन करते की, गैरअर्जदार क्र.५ आणि ६ हे सूध्दा अर्जदारास सतत शारिरीक व मानसिक त्रास देत असत. तसेच, अर्जदाराच्या संसारामध्ये नेहमी हस्तक्षेप करतात. अर्जदाराने गैरअर्जदारांकडून होत असलेल्या त्रासाबद्दल तिच्या माहेरच्या लोकांना फोनव्दारे व सनावाराला गेल्यानंतर कळविले असता अर्जदार हिचे आईवडील व इतर नातेवाईक यांनी गैरअर्जदाराकडे येवून त्यांची परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्यामुळे ते पैसे देवू शकत नाही असे सांगीतले व अर्जदार हिस नांदवण्याची विनंती केली. परंतू, गैरअर्जदारांनी तिच्या आईवडीलांचे व इतर नातेवाईकाचे काही एक न ऐकता "पैसे आणले तरच नांदवू" असे म्हणून एका वस्त्रानिशी घराबाहेर हाकलून दिले तेव्हापासून अर्जदार तिच्या आईवडीलांकडे राहत आहे. गैरअर्जदार यांनी कोणत्याही प्रकारे पालनपोषणाची व्यवस्था केलेली नाही. अर्जदार ही सद्या अत्यंत हलाखीचे जीवन जगत आहे. गैरअर्जदार क्र.१ ने अर्जदाराच्या उदरनिर्वाहाची कोणतीही जबाबदारी घेतली नाही. असे असताना, अर्जदाराने रूपये १५,०००/– पोटगी तसेच, कलम १८, १९, २०, २२ व २३ अन्वये संरक्षण आदेश, निवारा आदेश, आर्थिक नुकसान भरपाई इ. मागणी केली.

४. गैरअर्जदारास नि.क्र.२ च्या अहवालाप्रमाणे नोटीस प्राप्त होवून देखील तो हजर झालेला नाही. करीता प्रकरण एकतर्फी चालविण्यात आले.

५. अर्जदारातर्फे यूक्तीवाद ऐकला. खालील मुद्दे उपस्थित होतात व त्याचे कारणमिमांसा व निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

६. न्यायालयाच्या विचारार्थ निघालेले मुद्दे आणि त्यावरील निष्कर्ष खालील प्रमाणे –

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदारांनी अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार करुन तिचा शारीरिक व मानसिक छळ केला, हे अर्जदार | ...होकारार्थी. |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | सिद्ध करतात काय ? | |
| २. | अर्जदाराच्या मागणी प्रमाणे ती संरक्षणात्मक आदेशासाठी पात्र आहे काय ? | ...होकारार्थी. |
| ३. | अर्जदार निवासी आदेश मिळण्यास पात्र आहे काय ? | ...नकारार्थी. |
| ४. | अर्जदार आर्थिक सहाय्य मिळण्यास पात्र आहे काय ? | ...होकारार्थी |
| ५. | अर्जदार ही मागणी प्रमाणे गैरअर्जदारांनी केलेल्या शारिरीक व मानसिक छळाबद्दल नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत काय ? | नकारार्थी |
| ६. | अर्जदार ही मागणीप्रमाणे गैरअर्जदारांनी जमीन हस्तांतरीत अथवा विक्री करू नये या मागणी करिता पात्र आहे काय ? | ...होकारार्थी. |
| ७. | आदेश काय ? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे. |

## पटलावरील पूरावा

७. अर्जदार हिने तिचे पुराव्याचे शपथपत्र (नि.क्र.६) वर दाखल केले आहे. तसेच, मौजे उज्ञैनपूरी, ता. बदनापूर, जि. जालना येथील गटक्रमांक १०९ चा सातबारा उतारा नि.क्र.७ वर दाखल केला आहे. तसेच, नि.क्र.८ वर पुरसिस दाखल करून पुरावा बंद केला आहे. सदर प्रकरण एकतर्फा चालवण्याचे आदेश झालेले असल्याने गैरअर्जदारातर्फे कोणताही पूरावा अभिलेखावर नाही.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ व २ करीता**–

८. अर्जदाराने तिचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र (नि.क्र.६) यात अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केलेली आहे. अर्जदार हिच्या पुराव्यावरुन असे दिसून येते की, गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला लग्नानंतर एक महिना चांगले वागविले. त्यानंतर त्यांनी तिचा शारीरिक व मानसिक छळ करण्यास सुरुवात केली, अर्जदाराच्या आईवडीलांकडून घर बांधण्याकरीता

रूपये ८,००,०००/– ची मागणी केली आणि पैसे न दिल्यामूळे तिला मारहाण करुन घरातून हाकलून दिले.

९. गैरअर्जदारांना संधी मिळून देखील ते हजर झाले नाहीत किंवा अर्जदाराचा उलटतपास देखील घेतलेला नाही. त्यामुळे अर्जदार हिचा पुरावा आव्हानित झालेला नाही. अर्जदार हिच्या पुराव्यावरुन हे सिद्ध होते की, गैरअर्जदारांनी घर बांधण्यासाठी तिच्याकडे ८,००,०००/– रुपयाची बेकायदेशीर मागणी करुन तिला शारीरिक व मानसिक त्रास दिलेला आहे. तसेच, गैरअर्जदार क्र.१ सतत काही ना काही कारणावरून अर्जदाराशी भांडण करतो व दुसरे लग्न करण्याची धमकी देतो.

१०. गैरअर्जदारांना संधी देऊन देखील त्यांनी त्यांच्या कथनापृष्ठयर्थ पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे अर्जदार हिचा पुरावा आव्हानित झालेला नाही. तसेच, उलटतपास घेऊन अर्जदाराच्या कथनापेक्षा वेगळी परिस्थिती आहे असा पुरावा सादर केलेला नाही. अर्जदार हिच्या पुराव्यावरुन हे सिद्ध होते की, गैरअर्जदारांनी तिच्याकडे आठ लाख रुपयाची बेकायदेशीर मागणी करुन तिला शारीरिक व मानसिक त्रास दिलेला आहे. अर्जदाराने छळाबाबत सादर केलेला पुरावा हा नैसर्गिक आहे. त्यामुळे कौटुंबिक हिंसाचार घडला, ही बाब सिद्ध होते. त्यामुळे अर्जदार ही तिच्या मागणीप्रमाणे संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहे. त्यामुळे मी मुद्दा क्रमांक १ व २ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र. ३ बाबत :–**

११. अर्जदार हिने अर्जामध्ये निवाऱ्याची मागणी केली आहे. अभिलेखाची पाहणी केली असता अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ ची पत्नी आहे व ती सध्या माहेरी राहत आहे. अर्जदार हिने अर्जामध्ये अथवा पुराव्यामध्ये गैरअर्जदारांचे स्वत:चे घर आहे. तसेच, त्यामध्ये स्वतंत्र खोल्या आहेत याबाबत कोणताही पुरावा दाखल केलेला नाही अथवा त्या अनुषंगाने अर्जामध्ये कथन देखील केलेले नाही. त्यामुळे अर्जदार ही निवा–याची मागणी मिळण्याकरिता पात्र नाही. त्यामुळे मी मुद्दा क्रमांक ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

<u>मुद्दा क्र.४ करीता</u>–

१२. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे, तिच्या आईवडीलांनी लग्नात एकूण ७,००,०००/– रूपये हूंडा, भांडे व अन्य संसार उपयोगी साहित्य देवून थाटामाटात करून दिले. परंतू, अर्जदार हिने लग्नात ७,००,०००/– रूपये खर्च झाल्याबद्दल कोणताही कागदोपत्री पूरावा लावलेला नाही. करीता अर्जदाराच्या आईवडीलांनी लग्नात सात लाख रूपये खर्च केला हे सिध्द होत नाही. परंतू, अर्जदाराने शपथेवर कथन केले आहे की, गैरअर्जदार यास मौजे उज्जैनपूरी, ता. बदनापूर, जि. जालना येथे एकत्रीत कुटूंबाची गट क्र.१०९ मध्ये गैरअर्जदार क्र.१ चे वडील ताराचंद परसराम जाधव यांच्या नावे १ हेक्टर ८६ आर व गैरअर्जदाराचा भाउ सुमित ताराचंद जाधव यांच्या नावे ८० आर अशी सामाईक बागायती शेतजमीन असून त्यास वार्षीक उत्पन्न १०,००,०००/– रूपये मिळते. अर्जदाराने ईतर उत्पन्नाच्या साधनाबाबत पुरावा दाखल केलेला नसला तरी गैरअर्जदार यांचे एकत्रित कूटुंब असल्याबद्दलची विधाने नाकारलेली नाहीत. तसेच, गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदाराचा पती असल्याने अर्जदाराचे पालनपोषण करणे, तिच्या उदरनिर्वाहाची उपाययोजना करणे ही त्याची नैतिक जबाबदारी आहे.

१३. गैरअर्जदाराने अर्जदार हिचा पुरावा आव्हानित झालेला नसल्याने अर्जदार हिच्या पुराव्यावरुन हे सिद्ध होते की, गैरअर्जदाराकडे अर्जदार हिच्या पालनपोषणासाठी पुरेसे उत्पन्नाचे साधन आहे. अर्जदार हिने गैरअर्जदाराकडून तिला दरमहा रुपये १५,०००/– आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी विनंती केली आहे. अर्जदाराने गैरअर्जदाराच्या ईतर उत्पन्नाबाबत सातबारा उतारा वगळता इतर स्वतंत्र कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. अशा परिस्थितीत, गैरअर्जदाराचे शेतीपासून एकत्रितपणे येणारे उत्पन्न, अर्जदार यांच्या दैनंदिन गरजा, वाढलेली महागाई, त्यांच्या औषधोपचारासाठी लागणारा खर्च, कायदेशीर पत्नी म्हणून अर्जदार हिचे पोटगी संबंधीचे अधिकार, इत्यादी बाबींचा विचार केला असता गैरअर्जदाराने अर्जदार हिला आर्थिक सहाय्य म्हणून दरमहा रुपये ५०००/– अर्ज दाखल तारखेपासून देणे न्यायोचित होईल. त्यामुळे मी मुद्दा क्रमांक ४ चे उत्तर अंशत: होकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ बाबत</u> :–**

१४. अर्जदार हिने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण या कायद्याचे कलम २२ नुसार नुकसान भरपाईचे आदेश मिळण्यास विनंती केली आहे. अर्जदार हिच्या पुराव्यावरुन गैरअर्जदार क्रमांक १ याने तिला मारहाण केलेली आहे आणि शारीरिक इजा पोचविली आहे. तसेच तिच्याकडे पैशाची मागणी करुन तिला त्रास दिलेला आहे. मात्र अर्जदाराने अर्जामध्ये दहा लाख रुपयाची मागणी कोणत्या निकषाच्या आधारावर केली आहे याबाबत कोणताही खुलासा केलेला नाही. करीता अर्जदार ही नूकसान भरपाई मिळण्यास पात्र नाही. करीता मूद्दा क्र.५ चे उत्तर नकारार्थी नोंदवण्यात येते.

**<u>मुद्दा क्र.६ करीता</u>–**

१५. अर्जदार हिच्या पुराव्यावरुन असे दिसून येते की, गैरअर्जदाराने तिच्या उदरनिर्वाहाची कोणतीही तजवीज केलेली नाही. अर्जदाराने निशाणी क्र.७ अन्वये दाखल केलेल्या कागदोपत्री पूराव्यानूसार असे दिसून येते की, गैरअर्जदार क्र.३ व ४ यांच्या नावावर शेतजमीन आहे व गैरअर्जदार क्र.१ च्या नावाने कोणतीही शेतजमीन नाही. ज्याअर्थी कोणत्याही गैरअर्जदाराने अर्जदाराची कथने आव्हाणीत केलेली नाही त्याअर्थी गैरअर्जदार क्र.३ व ४ यांना जमीनीचे मालकी हस्तांतरण करण्यापासून प्रतिबंध करणे न्यायोचित होईल. करीता, मुद्दा क्र. ६ चे उत्तर होकारार्थी नोंदवण्यात येते.

**<u>मुद्दा क्र.७ करीता</u>–**

१६. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे, गैरअर्जदार याने अर्जदाराकडे दुर्लक्ष केले, तिच्या दैनंदिन गरजांची काळजी घेतली नाही व त्यासंबंधी कोणतीही तजवीज केली नाही. तसेच, गैरअर्जदारांकडून तिला कौटूंबिक हिंसाचार झाल्याचे तिने तोंडी पूराव्यानिशी सिध्द केले. अशा परिस्थितीत, अर्जदाराला न्यायालयाचे दार ठोठावे लागले, त्यामुळे गैरअर्जदाराला प्रस्तूत अर्जाच्या खर्चासाठी देखील जबाबदार ठरविण्यात येत आहे. गैरअर्जदार क्रमांक १ ह्याने अर्जदाराकडे दुर्लक्ष केले म्हणून तिला न्यायालयात यावे लागले, त्यामुळे गैरअर्जदार

क्रमांक १ याला सदरच्या अर्जाच्या खर्चासाठी देखील जबाबदार ठरविण्यात येत आहे. वरील सर्व विवेचनावरुन मुद्दा क्रमांक ७ च्या उत्तरादाखल मी खालील आदेश पारित करीत आहे –

## आदेश

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. गैरअर्जदार क्रमांक १ ते ६ यांना अर्जदार हिला कोणत्याही प्रकारचा शारिरीक किंवा मानसिक त्रास देण्यापासून प्रतिबंधीत करण्यात येते.

३. गैरअर्जदार क्रमांक १ याने, अर्ज दाखल तारखेपासून म्हणजेच दि.०५.०२.२०२५ पासून अर्जदार हिला दरमहा रक्कम रुपये ५,०००/– (अक्षरी रुपये पाच हजार मात्र) प्रमाणे आर्थिक सहाय्य द्यावे.

४. गैरअर्जदार क्रमांक १ याने अर्जदार हिला अर्जाचा खर्च म्हणून रक्कम रुपये २,०००/– (अक्षरी रुपये दोन हजार मात्र) द्यावेत.

५. गैरअर्जदार क्र.१,३ व ४ यांना गटक्रमांक १०९ मधील त्यांच्या नावे असलेली जमीन इतर कोणत्याही व्यक्तीस हस्तांतरीत करण्यापासून किंवा मालकी बदलण्यापासून प्रतिबंधीत करण्यात येत आहे.

६. प्रस्तुत आदेशाची प्रत संबंधितास विनाशुल्क देण्यात यावी. अर्जदार व गैरअर्जदार, संरक्षण अधिकारी व संबंधीत पोलिस स्टेशनला तात्काळ पाठविण्यात यावी.

**(सदर न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SIMA SACHIN JAIN
Date: 2025.06.25 12:17:48 +0530

दिनांकः २३/०६/२०२५ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१
अंबड

<u>प्रमाणपत्र</u>

मी शपथेवर निवेदन करतो की, सदर पी.डी.एफ.संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव :- एस. एम. सपकाळ
न्यायालयाचे नाव :- प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१, अंबड
पी.डी.एफ.दिनांक :- २५/०६/२०२५

स्वा/-
लघुलेखक